**<u>ठळक बातम्या</u>**

- शेती हा देशाच्या आर्थिक विकासाचा आधारस्तंभ असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- मित्र देशांशी चर्चा केल्याशिवाय अमेरिका अनेक निर्णय घेत असल्याची फिनलंडचे अध्यक्ष अलेक्झांडर स्टब यांची प्रतिक्रिया

- मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस थोड्याच वेळात सादर करणार राज्याचा अर्थसंकल्प

- आसाममध्ये काल सुखोई विमान कोसळून झालेल्या अपघातात नागपूरचे वैमानिक पूर्वेश दुरुगकर यांच्यासह आणखी एका वैमानिकाचा मृत्यू

**आणि**

- टी-ट्वेंटी विश्वचषक विजेतेपदासाठी रविवारी भारत आणि न्यूझीलंड यांच्यात सामना, संजू सॅमसन मालिकावीरांच्या संभाव्य यादीत

**<><><><><>**

शेती हा देशाच्या आर्थिक विकासाचा आधारस्तंभ असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. कृषी आणि ग्रामीण परिवर्तन या विषयावरच्या अर्थसंकल्पोत्तर वेबिनारला ते संबोधित करत होते. कृषी क्षेत्राला बळकटी देण्यासाठी सरकारने सातत्याने पावलं उचलली आहेत. यंदाचा अर्थसंकल्प शेती आणि ग्रामीण परिवर्तनाला प्रोत्साहन देत असल्याचं मोदी म्हणाले. देशात सध्या अन्नधान्य, डाळी आणि तेलबियांचं विक्रमी उत्पादन होत असून निर्यातीवर लक्ष केंद्रित करून रसायनमुक्त शेती आणि नैसर्गिक शेतीवर भर देण्याची गरज यावेळी मोदी यांनी व्यक्त केली.

**- - होल्ड.. बाईट - प्रधानमंत्री - -**

**<><><><><>**

मित्र देशांशी चर्चा न करता अमेरिका अनेक गोष्टी करत आहे. पूर्वी असं होत नव्हतं अशी प्रतिक्रिया फिनलँडचे अध्यक्ष अलेक्झांडर स्टब यांनी दिली आहे. नवी दिल्लीत सुरू असलेल्या रायसीना डायलॉगमध्ये ऑथर कॉर्नरमध्ये ते बोलत होते. आंतरराष्ट्रीय संघटनांमधलं विविध राष्ट्रांच्या वर्चस्वाची सद्यस्थिती बदलण्याची गरज त्यांनी पुन्हा व्यक्त केली. ग्लोबल साऊथचं महत्त्व वाढत असल्यानं हे गरजेचें असल्याचं ते म्हणाले.

आतापर्यंत जगाची पूर्व आणि पश्चिम अशीच दोन भागात विभागणी होत होती. ग्लोबल साऊथ ही नवी संज्ञा आता उदयाला येत असून ती महत्त्वाची असल्याचं परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

राज्याचा आगामी आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प आज विधीमंडळात सादर होणार आहे. मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस विधानसभेत दुपारी दोन वाजता अर्थसंकल्प सादर करतील. तर अर्थराज्यमंत्री आशिष जयस्वाल विधान परिषदेत हा अर्थसंकल्प मांडतील.

राज्याचा आर्थिक वर्ष २०२५-२६ चा आर्थिक पाहणी अहवाल काल मांडण्यात आला. राज्याच्या अर्थव्यवस्थेत सात पूर्णांक नऊ दशांश टक्के दरानं वाढ यात अपेक्षित आहे. या आर्थिक वर्षात राज्याची आर्थिक महसुली जमा पाच लाख ६० हजार ९६४ कोटी, तर महसुली खर्च सहा लाख सहा हजार ८५५ कोटी राहील असा अंदाज अहवालात वर्तवण्यात आला आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल विविध राज्य आणि केंद्रशासित प्रदेशात नवीन राज्यपालांची नियुक्ती केली. तेलंगणाचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांची महाराष्ट्राच्या राज्यपालपदी तर हिमाचल  प्रदेशचे राज्यपाल शिव प्रताप शुक्ला यांची तेलंगणाचे राज्यपाल म्हणून नेमणूक झाली आहे. बिहारचे माजी सभापती नंद

किशोर यादव हे नागालँडचे राज्यपाल म्हणून काम पाहतील. पश्चिम बंगालचे राज्यपाल डॉक्टर सी व्ही आनंद बोस यांचा राज्यपालपदाचा राजीनामा राष्ट्रपतींनी स्वीकारला आहे. तामिळनाडूचे राज्यपाल आर एन रवी आता पश्चिम बंगालचे राज्यपाल म्हणून तर केरलमचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर तामिळनाडूचे राज्यपाल म्हणून पदभार स्वीकारतील. लद्दाखचे नायब राज्यपाल कविंदर गुप्ता यांच्याकडे हिमाचल प्रदेशचं राज्यपालपद सोपवण्यात आलं असून दिल्लीचे नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना आता लद्दाखचे नायब राज्यपाल म्हणून काम पाहतील. माजी राजनैतिक अधिकारी तरनजीत सिंह संधू यांची दिल्लीच्या नायब राज्यपालपदी नेमणूक झाली आहे.

**<><><><><>**

आसाममध्ये काल सुखोई - 30MKI लढाऊ विमान कोसळल्यानं झालेल्या अपघातात दोन वैमानिकांचा मृत्यू झाला. स्वाड्रन लीडर अनुज आणि फ्लाइट लेफ्टनंट पुर्वेश दुरुगकर अशी या वैमानिकांची नावं आहे. दुरुगकर हे नागपूर जिल्ह्यातले रहिवासी होते.

जोरहाट इथल्या भारतीय हवाई दलाच्या तळावरून काल नियमित प्रशिक्षणासाठी निघालेलं हे विमान कार्बी आंगलोंग जिल्ह्यातल्या एका टेकडीवर कोसळलं.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या दोघांच्या अपघाती मृत्यूबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

छत्तीसगढच्या जशपूर जिल्ह्यात आज एक खाजगी प्रवासी बस उलटून झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला असून २० जण जखमी झाले आहेत. ही बस झारखंडमधून छत्तीसगढच्या कंकुरी शहरात जात होती.

**<><><><><>**

नेपाळमध्ये काल झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीची मतमोजणी सुरु असून बालेंद्र शाह यांच्या नेतृत्वाखाली नव्यानं स्थापन झालेला, आरएसपी, म्हणजेच 'राष्ट्रीय स्वतंत्र पक्ष' आघाडीवर आहे. नेपाळमध्ये जेन झी निदर्शनांमुळे के पी शर्मा ओली यांच्या नेतृत्वाखालचं युती सरकार कोसळल्यानंतर पहिल्यांदाच निवडणुका होत आहेत.

स्थानिक माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, काठमांडूच्या सर्व १० मतदारसंघांमध्ये आरएसपी आघाडीवर आहे. पदच्युत पंतप्रधान ओली यांचा सीपीएन (यूएमएल) पक्ष पाच जागांवर आघाडीवर आहे, तर गगन थापा यांच्या नेतृत्वाखालचा नेपाळी काँग्रेस पक्ष चार जागांवर आघाडीसह तिसऱ्या स्थानावर आहे.

नेपाळमध्ये काल झालेल्या निवडणुकीत ६० टक्के मतदान झालं. मतमोजणी आज रात्री पूर्ण होण्याची शक्यता असल्याचं नेपाळच्या निवडणूक आयोगानं सांगितलं.

**<><><><><>**

इराणच्या निःशस्त्र जहाजावर अमेरिकेनं केलेला हल्ला हे आंतरराष्ट्रीय कायद्याचं उल्लंघन असल्याचं इराणचे उप परराष्ट्रमंत्री सईद खतीबजादेह म्हणाले आहेत. या हल्ल्याचं प्रत्युत्तर देण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. श्रीलंकेच्या किनाऱ्याजवळ एका अमेरिकन पाणबुडीने इराणी युद्धनौकेला धडक दिली होती. भारताने आयोजित केलेल्या मिलान बहुपक्षीय नौदल सरावात भाग घेतल्यानंतर हे जहाज मायदेशी परतत होतं, तेव्हा हा हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात ८७ इराणी खलाशी ठार झाले आहेत.

दरम्यान, अमेरिका आणि इस्रायलने हल्ले सुरू केल्याच्या पार्श्वभूमीवर इराणने देशातली इंटरनेट सुविधा बंद केली असून ती अद्याप सुरू झालेली नाही.

दुसरीकडे हिजबोल्लाचं बेरुत इथलं मुख्यालय आणि लेबनॉनमधल्या लष्करी पायाभूत सुविधा असलेल्या इमारतींवर इस्रायलच्या हवाई दलाने आज हल्ला केला. यात संघटनेचा कमांडर झैद अली जुमाला ठार झाला आहे. झैद हा दक्षिण लेबनॉनमध्ये हिजबोल्लाच्या शस्त्रास्त्र विभागाचा प्रमुख होता. याशिवाय इस्रायली नौदलाने केलेल्या हल्ल्यात हमास या संघटनेचा कमांडर वसीम अत्ताल्लाह अली हाही ठार झाला आहे.

<><><><><>

पश्चिम आशियामधल्या अस्थिर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर इंडिगो एअरलाइन्सनं तिकीट रद्द केल्यावर कोणतंही शुल्क न आकारण्याचं धोरण आणखी काही काळ कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. पश्चिम आशिया आणि इस्तंबूल इथून भारतात प्रवास करणाऱ्यांना येत्या ३१ मार्च पर्यंत तिकीट रद्द केल्यावर कोणतंही शुल्क आकारलं जाणार नाही, असं विमान कंपनीनं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

<><><><><>

लंडनच्या रॉयल जिओग्राफिकल सोसायटीचा संवर्धनासाठीचा मानाचा पुरस्कार डॉ. क्रिती कारंथ यांना जाहीर झाला आहे. बेंगळुरुतल्या सेंटर फॉर वाइल्डलाईफ स्टडीजच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून त्या कार्यरत आहेत. हा पुरस्कार मिळालेल्या त्या पहिल्याच भारतीय आहेत. जागतिक परिसंस्था समजून घेण्यासाठी तसंच जैवविविधतेच्या रक्षणासाठी त्यांनी केलेल्या कार्याबद्दल हा पुरस्कार त्यांना जाहीर झाला आहे.

<><><><><>

टी–ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताने अंतिम फेरीत धडक मारली आहे. विश्वविजेते पदाची लढत रविवारी भारत आणि न्यूझीलंड यांच्यात होईल. अमदाबादमध्ये रविवारी हा सामना होणार आहे.

काल मुंबईत वानखेडे मैदानावर झालेल्या उपान्त्य फेरीच्या रोमहर्षक सामन्यात भारताने इंग्लंडचा सात धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करत भारतीय संघाने, संजू सॅमसनच्या ८९, शिवम दुबेच्या ४३ आणि ईशान किशनच्या ३९ धावांच्या बळावर सात बाद २५३ धावा केल्या. इंग्लंड संघाने जेकब बेथलच्या झंझावाती शतकी खेळीच्या जोरावर हे लक्ष्य गाठण्याचा प्रयत्न केला. मात्र इंग्लंडला २४७ धावांवर रोखण्यात भारतीय गोलंदाज यशस्वी ठरले. भारताचा सलामीवीर संजू सॅमसन सामनावीर ठरला. त्याचा समावेश मालिकावीरांच्या आयसीसीच्या संभाव्य यादीत झाला आहे. त्याच्याशिवाय इतर ७ जणांचा समावेश यात आहे. त्यात इंग्लंडचा विल जॅक्स, पाकिस्तानचा साहिबजादा फरहान, दक्षिण आफ्रिकेचा लुंगी गिडी आणि एडन मार्क्रम, न्यूझीलंडचा रचिन रविंद्र आणि टिम सेईफर्ट तसंच अमेरिकेचा शॅडली वॅन श्वालेक यांचा संभाव्य मालिकावीरांच्या यादीत समावेश आहे.

**<><><><><>**

येत्या २-३ दिवसात मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यात उष्णतेची लाट येण्याची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**//<><><><><>//**